# तीनीही देवांचे देव- महादेव

परमपिता परमात्मा शिव सर्वमान्य आणि विश्व कल्याणकारी आहेत.त्यांचे कर्तव्य दिव्य आणि अलौकिक आहे.ते संपूर्ण सृष्टीचे बीजरूप आहेत, म्हणून शिवरात्री सर्व उत्सवांमध्ये महान आणि दिव्य आहे.परमपिता शिव परमात्म्याला त्रिलोकीनाथ, त्रिमूर्ती, त्रिदेव आणि सर्वांचे कल्याणकारी म्हटले जाते. प्राचीन काळात जेव्हा मानवामध्ये आत्मबल होते तेव्हा त्यांना व त्यांच्या कर्तव्यास ओळखले जायचे परंतु काळाच्या ओघात मूल्यांचा -हास झाला त्यामुळे महाशिवरात्रीचे रहस्य व महादेवाच्या कार्याची विस्मृती झाल्याने मानव राजापासून रंक झाला.परंतु पुराणात आणि भगवतगीतेमध्ये परमात्मा शिवाने आपले वास्तविक स्वरूप आणि दिव्य कर्म स्पष्ट केले आहे.परमात्मा जन्म मरण रहित आणि कर्मबंधनापासून मुक्त असून देखील संपूर्ण सृष्टीचे संचलन सुव्यवस्थित सुचारू रूपाने करतात.म्हणुन शिव परमात्म्यास 'त्रिकालदर्शी' असेही म्हटले जाते.

**तीन देवतांच्या रचनेची आवश्यकता ः** जसे संस्था उद्योग व्यापार चालविण्यासाठी लोकांची आवश्यकता असते.तसेच या सृष्टीच्या संचलनासाठी देखील मोठी व्यवस्था करावी लागते.कालचक्रानुसार परमात्म्याकडून स्थापित सृष्टीची- स्थापना, पालना आणि तमोप्रधान जर्जर दुनियेच्या विनाशाचे कार्य निश्चित आहे,यासाठी तीन देवतांची आवश्यकता असते.परमात्मा शिव कल्याणकारी आहे, तसेच तो संपूर्ण विश्वाचा मालक, सृष्टीचा पिता आहे परंतु त्याचे स्पष्ट स्वरूप सध्या लोप पावले आहे.

या सृष्टीचा नियंता, विश्व कल्याणकारी, परमात्मा शिव म्हणतात कि, माझ्या स्वरूपास देवता, ऋषि-मुनि, मनुष्य कोणीच ओळखत नाहीत यासंदर्भात भगवतगीतेमध्ये ,

सर्वमेतदूतं मन्ये यन्मां वदसि केशव |
न हि ते भगवंव्यक्ति विदुर्देवा न दानवा |

परमात्म्याच्या स्वरूपास देवता आणि दानव कोणीही ओळखत नाहीत परमात्मा शिवाला साकार शरीर नसून ते सर्वशक्तिवान आणि सर्वगुणांचे भंडार आहेत.

**प्रजापिता ब्रह्माची रचना ः** मानव जेव्हा स्वतःचे कल्याण करण्याचे व श्रेष्ठ कर्म करण्याचे विसरतो तेव्हा या भूतलावर अंधकारमय रात्र असते त्यावेळी माणुसकीची ज्योत विझु लागते, आपलेपणा परकेपणाची जाण संपते तेव्हा पुनः एक सर्वगुणसंपन्न, मानवी मुल्यनिष्ठ एकता आणि 'वसुधैव कुटुंबकम' ची आवश्यकता किंवा गरज वाटू लागते तेव्हा या भूतलावर उध्दार करण्यासाठी परमात्मा शिव साधारण शरीरधारी प्रजापिता ब्रह्मांच्या शरीरात प्रवेश करतात.(शिवपुराणात नवव्या आध्यायामध्ये स्पष्ट वर्णन केले आहे) प्रजापिता ब्रह्माद्वारे सर्वमनुष्यात्म्यांना त्रिलोकीनाथ, तीनीही काळांचा (आदि-मध्य-अंताचा) आणि स्वतःचा परिचय देण्यासाठी मानव शरीराचा आधार घेतात.म्हणून त्यांना महामानव, भागीरथ आणि शिवाचे वाहन नंदीगण म्हटले जाते.हेच कारण आहे कि, शास्त्रांमध्ये ब्रह्मदेवास दाढी असणा-या पुरूषांसारखा व तीन तोंडे असणारा दाखविला आहे.त्यांच्या तीन तोंडाचा अर्थ त्यांना तीन लोक आणि तीन काळांचे (भूतकाळ, भविष्यकाळ आणि वर्तमानकाळांचे) ज्ञान होते म्हणून तीन तोंडे दाखवितात.ही रचना कलियुगाच्या अंतास आणि सतयुगाच्या प्रारंभी अर्थातच संगमयुगात होते.

**नवसृष्टीचा पालनकर्ता विष्णूची रचना ः** विश्व कल्याणकारी परमात्मा जग्गनाथ, विश्वनाथ अज्ञान अंधकारमय रात्रीमध्ये अवतरित होऊन प्रजापिता ब्रह्मांकडून नवीन सृष्टीची स्थापना करवून घेतात.नंतर श्रेष्ठ दुनियेच्या पालनेसाठी १६ कला संपूर्ण, सम्पूर्ण निर्विकारी देवीदेवतांची पालना करण्यासाठी विष्णूची रचना करतात.

pdfMachine
Is a pdf writer that produces quality PDF files with ease!
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, if you can print from a windows application you can use pdfMachine.
Get yours now!

**विनाशासाठी शंकराची रचना ः** घोर कलियुग आणि अज्ञान अंधकारमय रात्रीमध्ये नवसृष्टीची स्थापना पूर्ण होते तेव्हा या पतित विकारी, अधर्मी सृष्टीच्या विनाशाची आवश्यकता भासू लागते तेव्हा परमात्मा शिव शंकराची रचना करतात. म्हणून म्हणतात शंकराने तिसरा डोळा उघडला कि, या कलियुगाचा विनाश होतो. महाभारी महाविनाशाच्या वेळी ब्रह्मा, विष्णू, शंकर या तीन देवतांची रचना शिव करतात. या तीन देवतांकडून परमात्मा शिव सृष्टीचे संचलन करीत असतात म्हणून परमपिता शिव परमात्म्यास 'देवाधिदेव महादेव' देखील म्हणतात. म्हणूनच सर्व शक्तिवान शिवाचे ध्यान ब्रह्मा, विष्णू, शंकर देखील करतात. विष्णू पुराणात याचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे.

**शिवरात्रीचा संदेश ः** शिवरात्री विकारी प्रवृत्तींचा सर्व विनाश आणि दैवी शक्तिच्या स्थापनेची अलौकिक वेळ आहे. आज चोहीकडे अधर्मात पूर्ण समाज बुडालेला आहे म्हणून या सृष्टीस अधर्माने बरबटलेली सृष्टी म्हणावी लागेल. वर्तमानकाळात प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाची स्थापना करून परमात्मा शिव जनतेतील अज्ञान दुर करून दैवी गुणांनीयुक्त दुनियेची स्थापना प्रजापिता ब्रह्मांच्या शरीराचा आधार घेऊन करीत आहेत म्हणूनच, ही वेळ झोपण्याची नसून जागृत होण्याची आहे.

**रात्र वै-याची आहे जागा रहा.....**

परमात्मा शिव आम्हा मनुष्यात्म्यांना संदेश देत आहेत कि, अज्ञान अंधःकाराच्या झोपेतून उठा आणि स्वतःला व परमपित्याला ओळखून, ईश्वरीय शक्तिला जाणून, आपल्यातील अवगुणांना समाप्त करून दैवी गुणांचा स्विकार करा. आज चोहीकडे राक्षसी, अमानवीय शक्तिचे स्तोम माजले आहे. विनाशाची चिन्हे सर्वत्र दिसत आहेत म्हणूनच या अंताच्या वेळी परमात्म्याला जाणून घेणे हीच खरी बुद्धिमत्ता होय. वर्तमानकाळी महाविनाशासाठी विज्ञानाचे अस्त्र-शस्त्र, प्रकृती आणि मानव प्रतिक्षा करीत आहेत. निश्चित वेळेनुसार महाविनाश तर होणारच म्हणून वेळ असताना जागृत होणे म्हणजे शहाणपणाचे लक्षण होय. याकरिता स्वतः बदलून स्वर्णिम दुनियेचे अधिकारी बना, हीच परमात्मा शिवाची आज्ञा आणि संदेश आहे, नाहीतर शेवटी पश्चातापाच्या अश्रु शिवाय काहीही करता येणार नाही.

प्रति,
सादर प्रकाशनार्थ ,
दै.
कार्यालय, इचलकरंजी.

**pdfMachine**
**Is a pdf writer that produces quality PDF files with ease!**
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, if you can print from a windows application you can use pdfMachine.
Get yours now!